**मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) द्वितीय बैठक दि. २५/०७/२०१९ रोजी सकाळी १२.०० वाजता सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त :**

मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची **(Special Environment Surveillance Task Force)** ची स्थापना प्रदूषण पट्टे असलेल्या जिल्हयाची करावयाची असल्याचे आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने कार्यालयीन आदेश क्र. ९४०/२०१९ दि. ०८/०७/२०१९ नुसार स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची **(Special Environment Surveillance Task Force)** स्थापना करण्यात आलेली आहे. सदर सनियंत्रण दलाची पहिली बैठक दि. १०/०७/२०१९ रोजी संपन्न झाली असून बैठकीचे इतिवृत्त संबंधीत सदस्यांना अवगत करुन देण्यात आले.

स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची द्वितीय बैठक दि. २५/०७/२०१९ रोजी घेण्यात आली असून सदर बैठकी दरम्यान खालील सदस्य तथा निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **कृती दलाचे सदस्य** | **सदस्य** |
|---|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी | श्रीमती. भाग्यश्री जोशी,<br>जिल्हा खनिकर्म अधिकारी, |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी | श्री. भागवत फुंदे,<br>पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, औरंगाबाद. |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप-प्रादेशिक अधिकारी) | श्री. प्रदिप द. वानखेडे,<br>उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. |
| ४ | विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी | श्री. आर.एफ.गाझी,<br>सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, औरंगाबाद. |

तसेच सदर बैठकी दरम्यान या पुर्वीच्या बैठकीमध्ये ठरविल्याप्रमाणे खालील निमंत्रित सदस्य उपस्थित होते :-

| **अ.क्र.** | **उपस्थित निमंत्रित सदस्य** | **पद** |
|---|---|---|
| १ | श्री. महेश सावंत | तहसिलदार, ता. पैठण. |
| २ | श्री. सोमनाथ जाधव | मुख्याधिकारी, ता. पैठण. |

प्रथमत: उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद यांनी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची **(Special Environment Surveillance Task Force)** बैठकी दरम्यान सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन मा. राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आल्या बाबत व मा. हरित लवाद यांनी सदर प्रकरणी दिनांक. २९/०९/२०१८ रोजी आदेश व राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत कृति आराखडा राबविण्याबाबत नदी पुनरुत्थान समितीची स्थापना करण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८ च्या शासन निर्णयाबाबत समितीने करावयाच्या कामाकाजाची व त्यांच्या कार्यकक्षेबाबत माहिती सर्व उपस्थितांना अवगत करुन दिली.